दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

वर्ष–४

अंक–१२



तन्वी फाउंडेशन
सौ. ज्योती राजकांत पाटील

## दिव्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या प्रगतीसाठी

## तन्वी फाउंडेशन

आणि

## तन्वी महिला बचत गट

यांचा पुढाकार



सर्वसामान्य नागरिकांची कुटुंब सक्षम व्हावी या भूमिकेतून **तन्वी फाउंडेशन** व **तन्वी महिला बचतगट** यांच्या माध्यमातून महिलांसाठी रोजगार संधी व बचत गटांना प्राधान्य म्हणून दिपावली सणानिमित्त विविध योजनांचा शुभारंभ...

- महिलांच्या बचत गटांसाठी लोन सुविधा
- छोटे मोठे लघु उद्योग करणाऱ्या नागरिकांसाठी भांडवल सुविधा
- सर्वसामान्य कुटुंबातील महिलांसाठी आरोग्य तपासणी सुविधा

आजच संपर्क करा **तन्वी फाउंडेशन**च्या लोकहिताच्या उपक्रमाचा लाभ घ्या **तन्वी फाउंडेशन** परिवारात मध्ये सहभागी व्हा!

**–: संपर्क क्रमांक :–**

**मो. ९९२०८१९०१६/७२०८५७३२१४**



## सौ ज्योती राजकांत पाटील

अध्यक्षा - तनवी फाउंडेशन
महिला संघटिका, शिवसेना (UBT)

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि.२१ ऑक्टोबर २०२४ पान : २
www.diwanews.com

# बदलापुरात शिंदे तर ठाण्यात यादव विनयभंगाच्या घटना सुरूच

## ठाणे शिवसेना महिला आघाडीतर्फे आरोपीला पुन्हा अटक करण्याची मागणी

**ठाणे:** महाराष्ट्र राज्यात दिवसेंदिवस महिलांवरील अत्याचाराच्या घटना वाढत आहेत. त्यामध्ये पुणे व ठाणे जिल्हा या ठिकाणी वारंवार एका मागून एक अशा घटना घडत आहेत. नुकताच बदलापूर येथे अक्षय शिंदे या आरोपीकडून चिमुकल्या मुलीवर केलेल्या अत्याचाराचा संपूर्ण देशाने निषेध केला आहे. अशी ताजी घटना घडलेली असताना मुख्यमंत्र्यांच्या ठाण्यात त्यांच्याच पक्षातील उपविभाग प्रमुख सचिन यादव याने भंडारआळी येथील ११ वर्षाच्या चिमूरड्या मुलीवर विनयभंग केल्याची घृणास्पद घटना घडली आहे. अशा आरोपीला जामीन कसा मंजूर होऊ शकतो यावर प्रश्नचिन्ह पडले असल्याने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या महिला आघाडीच्या वतीने सोमवारी ठाणे नगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयकुमार देशमुख यांना निवेदन देण्यात आले आहे. त्यामध्ये या आरोपीला सोडण्यासाठी जर राजकीय हस्तक्षेप होत असेल तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) ठाणे जिल्हा महिला आघाडीच्या वतीने आंदोलन करण्यात येईल असे निवेदन देण्यात आले आहे. तसेच या आरोपीवर पोक्सो अंतर्गत अधिकाधिक कठोर गुन्हा दाखल करून त्याला पुन्हा अटक करण्यात यावी अशी मागणीही करण्यात आली आहे. त्यावेळी महिला जिल्हा संघटक रेखाताई खोपकर, समिधा मोहिते, आकांक्षा राणे, महेश्वरी तरे, प्रमिला भांगे, वैशाली शिंदे, मंजिरी ढमाले, संगीता साळवी, कांता पाटील, सुप्रिया गावकर, सुनंदा देशपांडे ,नंदा कडकोळ, रजनी बंका, हेमांगी पांचाळ, सचिन चव्हाण, संजय भोई, राकेश जाधव, आनंद मानकामे, वरून मानकामे, अजय पवार, बिपिन गेहलोत तसेच इतर शिवसेना पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ठाण्याच्या शासकीय रुग्णालयात महिलेने दिला तीन मुलांना जन्म!



## दीड महिन्यांच्या उपचारानंतर मिळाला डिस्चार्ज

*सोनोग्राफी केल्यावर नाझमिन हिच्या पोटात तीन बाळ आहेत. हे समजताच खूप आनंद झाला होता. यानंतर नाझमिन हिने दिलेल्या सर्व सूचना व पथ्य व वेळोवेळी तपासणी केली. प्रसूतीत एकापाठोपाठ तीन बाळांना तिने जन्म दिला. तिन्ही बाळ व आई सुखरूप असून आमच्या वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या मला अभिमान आहे.*

***-डॉ. कैलास पवार,***
*जिल्हा शल्य चिकित्सक ठाणे*

**ठाणे :** ठाणे जिल्हा शासकीय (सिव्हील) रुग्णालयातील अद्यावत प्रसूतीगृह बाळांसाठी वरदान ठरत आहे. नुकतेच या रुग्णालयात एका महिलेने तीन बाळांना जन्म दिला असून ती तिन्ही मुले आहेत. तसेच दीड महिन्याच्या उपचारांनंतर गुरूवारी आई आणि बाळांना रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाला आहे.

ठाणे सिव्हील रुग्णालय सर्वसामान्य रुग्णांसाठी आधारवड ठरत असून, जिल्ह्याच्या शहरी, ग्रामीण आणि दुर्गम आदिवासी भागातील रुग्ण उपचारासाठी येत आहेत. रुग्णालयातील प्रसूतीगृह अद्यावत असून, प्रसूतीसाठी जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून महिला उपचारासाठी येत आहेत. सर्वसुख सोयींनी सज्ज असणाऱ्या प्रसूतीगृहात जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धीरज महांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णालयात उपचारार्थ दाखल झालेल्या भिवंडीमधील नाझमिन (३१) नामक महिलेने ४ सप्टेंबर रोजी तीन सुदृढ बाळांना जन्म दिला. विशेष म्हणजे त्या महिलेला तिन्ही मुले झाली आहेत. वजन अनुक्रमे पहिले एक किलो २०० ग्रॅम, दुसरे एक किलो तर तिसरे ९०० ग्रॅम असे आहे. दीड महिन्यात बाळाचं वजन वाढल्यानंतर गुरूवारी त्या मायलोकांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले आहे. या प्रसूतीदरम्यान बाल रोग तज्ज्ञ डॉ. सुरेश वानखेडे, स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. श्रेया शेळके, भुल तज्ज्ञ डॉ. प्रियांका महांगडे या बरोबर डॉ. शैलेश गोपनपल्लीकर, डॉ. राहुल गुरव, एसएनसीयू परिचारिका सारिका शेणेकर आणि कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले

# टँकरला किरकोळ आग चालकाने अग्निशामक यंत्राने मिळविले आगीवर नियंत्रण

ठाणे: घोडबंदर रोड मार्गे ठाण्यातून वसई कडे निघालेल्या २३००० लीटर पेट्रोल व डिझेल असलेल्या टँकरच्या टाकीवरील पेट्रोल भरण्याच्या होझ पाईपला सोमवारी दुपारी पावणेचार वाजण्याच्या सुमारास किरकोळ आग लागली. ज गायमुख जकात नाक्याजवळ घडलेल्या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन टँकरचालक मनोज यादव यांनी अग्निशामक यंत्राच्या साहाय्याने त्या आगीवर नियंत्रण मिळविले. त्यामुळे मोठे अनर्थ टळले. तसेच तो टँकर पुढे वसईला रवाना झाल्याची माहिती ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी दिली. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेतली. मात्र ते पोहोचण्यापूर्वीच आग नियंत्रण आणण्यात टँकर चालकाला यश आले. तसेच या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी दिली.

## सी-व्हिजिल ॲपवर आचारसंहिता भंगाच्या ४२० तक्रारी प्राप्त

**मुंबई :** राज्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ साठी १५ ऑक्टोबर २०२४ रोजी आचारसंहिता लागू झाली आहे. १५ ते १८ ऑक्टोबर २०२४ पर्यंत राज्यभरात सी-व्हिजिल (- ) ॲपवर एकूण ४२० तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ४१४ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत. यापैकी १०० मिनिटांत २५६ तक्रारींचा निपटारा करण्यात आल्या आहे. राज्यात सर्वात जास्त ठाणे जिल्ह्यातील तक्रारींचे निवारण करण्यात आले आहे.

विधानसभा निवडणुकीसाठीची आदर्श आचारसंहिता लागू झाल्यापासून राज्य शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेले बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज व मौल्यवान धातू इत्यादी बाबतीत एकूण १०६४ लक्ष रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

# रमाकांत मढवी यांना उमेदवारी मिळाल्यास कल्याण ग्रामीणच्या तिरंगी लढतीत मनसे आणि ठाकरे गटाचे गणित बिघडणार?

**दिवा :-** शिवसेनेकडून रमाकांत मढवी इच्छुक आहेत. तशी तयारी त्यांनी सुरू केली आहे. दिवा शहरासह कल्याण ग्रामीण मध्ये बैठकांचा जोर वाढला आहे.रमाकांत मढवी यांना शिवसेनेने उमेदवारी दिल्यास येणाऱ्या विधानसभेत निकाल वेगळे असतील असं मत आता जाणकार व्यक्त करत आहेत.

माजी उपमहापौर रमाकांत मढवी हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार श्रीकांत शिंदे यांच्या जवळचे मानले जात असल्याने त्यांच्या उमेदवारीमुळे कल्याण ग्रामीणच्या तिरंगी लढतीत मनसे व ठाकरे गटाचे गणित बिघडू शकते अशीही चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

दिवाशहरातसाधारणएकलाखाच्यावरमतदारआहेत.त्याचबरोबर शिंदे यांच्या शिवसेनेची ताकद कल्याण ग्रामीण मतदार संघात आहे. शिवसेना फुटी नंतर दिवा शहर शिवसेनेवर रमाकांत मढवी यांची एक हाती पकड राहिली आहे. रमाकांत मढवी यांचा लोकसंवादाचा कार्यक्रम अधिक भरगच्च असल्याचे मागील काही दिवसांपासून पाहायला मिळेत.दररोज त्यांच्या बैठकांचे प्रमाण वाढत असून कोकणातील तसेच पश्चिम महाराष्ट्रातील मतदारांच्या भेटीगाठी त्यांनी सुरू केल्या आहेत. शिवसेना शिंदे गट कल्याण ग्रामीण मध्ये चांगलाच सक्रिय झाला असून खासदार श्रीकांत शिंदे यांचे पाठबळ आणि पक्षाची संघटनात्मक बांधणी याच्या जोरावर रमाकांत मढवी यांची उमेदवारी अधिक मजबूत होईल असे मत आता राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत. येणाऱ्या विधानसभेत शिवसेना शिंदे गट, मनसे व शिवसेना ठाकरे गट अशी तिरंगी लढत झाल्यास रमाकांत मढवी यांचे पारडे जड राहू शकते आणि आश्चर्यकारक निकाल लागू शकतात अशी चर्चा आता राजकीय वर्तुळात रंगली आहे.

## इलेक्शन फंडींगसाठी ठाणे महापालिकेने गुपचूप जाहीर केला शहर विकास आराखडा

**ठाणे –** शहराच्या विकासाची दिशा ठरविणारा ठाणे शहराचा विकास आराखडा घाईत ठाणे महापालिका प्रशासनाने जाहीर केला आहे. विकासकांच्या फायद्यासाठी असलेला व आगामी निवडणुकीसाठी एका राजकीय पक्षाला फंडींग मिळवून देण्यासाठी हा विकास आराखडा राबविला जात असल्याचा आरोप ठाणे काँग्रेसचे अध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी सोमवारी ठाण्यात घेतलेल्या पत्रकार परिषदेत केला. अडीच वर्षांचा काळ उलटून गेला असून ठाणे महापालिकेचे सभागृह अद्याप अस्तित्वात नाही. आता विधानसभेचे बिगुल वाजणार आहे. त्याआधीच काही दिवसांपूर्वी ठाणे महापालिका प्रशासनाने शहर विकास आराखडा गुपचूप जाहीर केला आहे. शहराच्या विकासात लोकप्रतिनिधी आणि नगरसेवकांचे महत्वाचे योगदान असते. विकासाच्या मुद्यावर लोकप्रतिनीधी आवाज उठवत असतात. सभागृह अस्तित्व नसताना लोकप्रतिनिधींना पालिका प्रशासनाने विश्वासात घेऊन विकास आराखडा जाहीर करायला हवा होता असे मत चव्हाण यांनी मांडले. विधानसभा तोंडावर असताना राजकीय पक्षांना निवडणूक निधीची गरज असते. शहर विकास आराखडा विकासकांच्या मर्जीनुसार बनवून एका राजकीय पक्षाला याच्या माध्यमातून निवडणूक निधी उभारला असल्याचा आरोप चव्हाण यांनी केला.

## २७ गावांचा पुन्हा कल्याण डोंबिवली मनपात समावेश

**ठाणे :** नुकताच ठाण्यात मोठा जल्लोष साजरा करण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गेल्या ३० वर्षांपासून प्रलंबित असलेला २७ गावांचा प्रश्न मार्गी लावल्यामुळे एकूण गावातील शासकीय कर्मचारी आणि नागरिकांनी त्यांचा सत्कार केला. शिवाय पेढे भरवून त्यांचे तोंड देखील गोड केले. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतून वगळण्यात आलेली २७ गावे पुन्हा कल्याण मुंबई महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात आली आहेत. या गोष्टीचा फायदा गावकऱ्यांना होणार आहे. यामुळे कडोंपातून लाभ देखील गावांना घेता येणार आहे.

शिवाय ९०० कोटी रुपयांचा कडोंपाचा करमाफी असेल त्याच बरोबर संत सावळाराम महाराजांच्या स्मारकासाठी १० एकर जागा देणे असेल, अशा विविध कामांचे शासन निर्णय जारी करण्यात आले. यामुळे २७ गावातील हजारो नागरिकांनी आणि शेकडो शासकीय कर्मचाऱ्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांचा जाहीर सत्कार केला. यानिर्णयामुळे गावातील हजारो नागरिक आणि शेकडो शासकीय कर्मचारी आनंदी झाले असून, हॉटेल टीप-टॉप येथे मोठ्या जल्लोषात मुख्यमंत्री आणि खासदार श्रीकांत शिंदे यांचा सत्कार करण्यात आला.

## डोंबिवली रेल्वे स्थानक शेजारील भित्तीचित्र व सुशोभिकरणाचे लोकार्पण

**डोंबिवली : साहित्य-कला-क्रीडा -चित्रपट, उद्योग क्षेत्रासाठी डोंबिवील शहराने अनमोल अशी रत्ने दिली आहेत. त्या सर्वांच्या कार्याची यशोगाथा प्रत्येक पुढील पिढीस माहित व्हावी आणि त्यांची प्रेरणा भावी पिढीस मिळावी, आणि त्या अनमोल व्यक्तीमत्त्वांचा गौरव या उद्देशाने डोंबिवली रेल्वे स्थानकाचा दोन्ही बाजूस शहराला साजेसे सुशोभीकरण करून भित्तीचित्रांची निर्मिती करण्यात आली आहे.**

त्या सुशोभिकरणाचे लोकार्पण कॅबिनेट मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. भाषा प्रभू पु.भा. भावे डोंबिवली भूषण साहित्य शन्ना नवरे, आंतर राष्ट्रीय उद्योजक गजानन पेंढरकर, दत्तात्रय म्हैसकर, शिक्षणतज्ज्ञ सुरेंद्र वाजपेयी, जागतिक कीर्तीचे सल्लागार संदीप वासलेकर ही सर्व व्यक्तिमत्त्व डोंबिवलीच्या मातीत घडली आणि मोठी झाली. त्यांच्या बरोबरीने डोंबिवली साहित्यक, कला-चित्रपट, उद्योग-क्रीडा क्षेत्राला अनमोल रत्न दिलीत. त्यांच्या कार्याची गाथा आजच्या पिढीच्या स्मरणात रहावी आणि भावी पिढीस प्रेरणा द्यावी या हेतूने डोंबिवली रेल्वे स्थानकाच्या दोन्ही बाजूस सुशोभिकरण करून भित्तीचित्रे निर्मिती केली आहेत.

सदर लोकार्पण कार्यक्रमाप्रसंगी व्यासपीठावर भाजपा-कल्याण जिल्हाध्यक्ष नरेंद्र (नाना) सुर्यवंशी, महायुतीचे डोंबिवली विधानसभा समन्वयक शशिकांत कांबळे, माजी नगरसेवक शैलेश धात्रक, डोंबिवली पश्चिम मंडल अध्यक्ष समीर चिटणीस, माजी नगरसेवक विशु पेडणेकर, विनोद काळण, विकास म्हात्रे, विद्या म्हात्रे, पूनम पाटील आदी उपस्थित होते.

मंत्री रविंद्र चव्हाण म्हणाले की, विविध क्षेत्रात प्रथम ठरलेल्या डोंबिवलीकरांना मानवंदना देण्याते भाग्य आम्हाला या उपक्रमातून मिळाले आहे. शहराच्या विकासात अमूल्य योगदान देणाऱ्या अशाप्रकारे गौरव करणारे डोंबिवली हे देशातील पहिले शहर असावे. डोंबिवली ही सांस्कृतिक उद्योग नगरी आहे. या अनमोल व्यक्तीमहत्त्वामुळे शहरातील तरुण आणि लहान मुलांना आपल्या ज्या क्षेत्रात मोठे व्हायचे आहे त्या दृष्टीकोनातून पुढे जाता येऊ शकते. ही अनमोल रत्ने तरुणांसाठी आदर्श ठरतेय.

कोल्हापूरच्या मातीत पेहलवान घडतात तसेच डोंबिवलीमध्ये अनमोल रत्न राहतात.

पूर्वी स्टेशन परिसरात याठिकाणी अनधिकृत गाळे होते. शासनाच्या सहभागाने तत्कालिन रेल्वेमंत्री पियुष गोयल यांच्याकडे आम्ही मागणी केली होती की, या जागेत काही व्यावसायिक उभे न करता काहीतरी चांगले उभे करू ज्यामुळे शहराला एक वेगळी ओळख मिळेल, डोंबिवलीकरांना असे आश्वासन दिले होते. त्यानुसार संपूर्ण परिसर सुशोभिकरण करण्याचे पाऊल उचलले गेले. एक महिन्याच्या आत पूर्व-पश्चिमचे काम पूर्ण होऊन एक चांगले चित्र दिसून येईल. बाहेरून शहरात येणाऱ्या प्रत्येकाला आपल्याही शहरात अशी भित्तीचित्रे असावी असे नक्की वाटेल असा विश्वास चव्हाण यांनी यावेळी व्यक्त केला.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
www.diwanews.com
सोमवार, दि.२१ ऑक्टोबर २०२४ 

# टीएमटी मधील सुट्ट्या पैशावरून होणारे वाद टाळणार



## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले माझी टीएमटी या मोबाईल ॲपचे लोकार्पण

### प्रवाशांना काढता येणार मोबाईल ॲपद्वारे तिकिट

**ठाणे : ठाणे परिवहन सेवेच्या प्रवाशांना विविध सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या माझी टीएमटी या मोबाईल ॲपचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते नुकतेच लोकार्पण करण्यात आले. या ॲपमुळे प्रवाशांना यूपीआयद्वारे डिजिटल तिकिट काढण्याची सुविधा मिळणार आहे. सध्या ही सुविधा काही बसमार्गावर सुरू करण्यात आली आहे. ती टप्प्याटप्प्याने टीएमटीच्या सर्व बसमार्गांवर प्रवाशांना वापरता येणार आहे.**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी (११ ऑक्टोबर २०२४) धर्मवीर आनंद दिघे वाचनालय आणि अभ्यासिकेचे लोकार्पण केले. त्याच ठिकाणी ठाणे महापालिका परिवहन सेवेच्या माझी टीएमटी या मोबाईल ॲपचेही लोकार्पण करण्यात आले. या मोबाईल ॲपद्वारे तिकिट काढण्याची पद्धत, बसमधील वाहकाकडून त्याचे केले जाणारे व्हेरिफिकेशन याचा डेमो याप्रसंगी मुख्यमंत्री शिंदे यांनी पाहिला. प्रवाशांसाठी ही चांगली सुविधा असल्याचे प्रतिपादन याप्रसंगी मुख्यमंत्री शिंदे यांनी केले. यावेळी, खासदार नरेश म्हस्के, आमदार प्रताप सरनाईक, महापालिका आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, टीएमटीचे व्यवस्थापक भालचंद्र बेहेरे, माजी नगरसेवक विकास रेपाळे, नम्रता भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

या मोबाईल ॲपद्वारे प्रवाशांना यूपीआय वापरून डिजिटल तिकिट काढता येईल. तसेच, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, नेट बँकिंगचा वापर करून पैसे भरता येतील. त्याचप्रमाणे, प्रवाशांना बस कोठे आणि किती वेळेत स्टॉपवर येणार याची माहिती देण्याची सुविधाही या ॲपमध्ये आहे. प्रवाशांना ॲपवर प्रवासाच्या सुरुवातीचे ठिकाण आणि गंतव्य स्थान यांची माहिती भरून बसमार्ग, त्या मार्गावरील उपलब्ध बसगाड्या, त्यासाठी लागणारे तिकिट भाडे याचीही माहिती मिळणार आहे.

डिजिटल तिकिटांच्या व्यवस्थेमुळे वाहकांची रोख रक्कम हाताळण्याची संख्या कमी होईल आणि सुटे पैसे नसल्याने प्रवासी आणि वाहक यांच्यात होणारे वाद यामुळे टळतील, अशी अपेक्षाही टीएमटी व्यवस्थापनाला आहे. सध्या ॲपद्वारे तिकिटांची ही सुविधा काही बसमार्गावर सुरू करण्यात आली आहे. ती टप्प्याटप्प्याने टीएमटीच्या सर्व बसमार्गांवर प्रवाशांना वापरता येणार असल्याचे टीएमटी व्यवस्थापनाने सांगितले.

---

# ज्येष्ठ अभिनेते विजय गोखले यांना यंदाचा गंधार गौरव पुरस्कार जाहीर



### ज्येष्ठ अभिनेते उदय सबनीस यांनी केली पत्रकार परिषदेत घोषणा

## गंधार बालकलाकार पुरस्कार स्पृहा दळी हिला

**ठाणे :** हिंदी मराठी चित्रपट आणि मालिका सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते विजय गोखले यांना यंदाचा गंधार गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार सोहळा ठाण्यातील डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे आयोजित करण्यात आल्याची माहिती ज्येष्ठ अभिनेते उदय सबनीस आणि ज्येष्ठ साहित्यिक प्रा. प्रदीप ढवळ यांनी पत्रकार परिषदेत दिली. तसेच, गेल्यावर्षीपासून गंधार बालकलाकार पुरस्कार सुरू केला असून यंदाचा पुरस्कार स्पृहा दळी हिला देण्यात येणार आहे.

गंधार या बालनाट्य संस्थेच्यावतीने गंधार गौरव सोहळ्याचे दरवर्षी आयोजन केले जाते. यंदाचे हे नववे वर्षे आहे. ज्येष्ठ साहित्यिक रत्नाकर मतकरी, विद्या पटवर्धन, दिलीप प्रभावळकर, अशोक समेळ, नरेंद्र आंगणे, अतुल परचुरे, सचिन पिळगावकर तर गेल्यावर्षी महेश कोठारे यांना आतापर्यंत गंधार गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. यंदाचा हा पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते गोखले यांना देण्यात येत आहे. ज्येष्ठ दिग्दर्शक राजदत्त, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. प्रदीप ढवळ, ज्येष्ठ अभिनेते अरुण नलावडे आणि ज्येष्ठ संगीतकार अशोक पत्की यांच्या हस्ते गोखले यांना पुरस्कार देण्यात येणार आहे. यावेळी बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा नीलम शिर्के – सामंत देखील उपस्थित राहणार आहेत. गेल्यावर्षी गंधार बालकलाकार पुरस्कार खुशी हजारे हिला दिला होता. मे महिन्यात गंधारतर्फे विविध जिल्ह्यांत गंधार गौरव बालनाट्य स्पर्धा घेण्यात आली होती.

या स्पर्धेसाठी ठाणे, मुंबई, नवी मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद येथून प्रवेश आले होते. या स्पर्धेसाठी मकरंद पाध्ये आणि प्रकाश निमकर यांनी परीक्षण केले होते. या स्पर्धेतील नामांकने देखील आज जाहीर करण्यात आली. या पत्रकार परिषदेला गंधारचे प्रा. मंदार टिल्लू, सुनील जोशी, अमोल आपटे, वैभव पटवर्धन, पी. एन. पाटील आदी उपस्थित होते.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि.२१ ऑक्टोबर २०२४ 
www.diwanews.com



**दिवा :-** दिव्यात शिवसेनेच्या ठाकरेंच्या मा. आमदार सुभाष भोईर यांच्या प्रयत्नातून ठाणे महानगरपालिकेच्या माध्यमातून दिवा प्रभात समिती अंतर्गत राधाबाई अपार्टमेंट ते ओम व्हिला बिल्डिंग पर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे कामाचा भूमिपूजन सोहळा पार पडला. यावेळी शिवसेनेचे सर्व पदाधिकारी, व महिला कार्यकर्ते उपस्थित होते.

# आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर बॅनर, झेंडे, पोस्टरवर कारवाई

**ठाणे :** राज्यात विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला असून आचारसंहिता लागू होताच जिल्ह्यातील सहा महापलिका, नगर परिषद आणि जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून ठाणे जिल्ह्यातील विविध चौकात, खासगी जागेवर, शासकीय जागांवर लावण्यात येणाऱ्या राजकीय बॅनर, पोस्टर आणि झेंडे हटविण्याची मोहिम प्रशासनाने हाती घेतली आहे. ही कारवाई करताना गेल्या ७२ तासांत जिल्ह्यामधील १८ विधानसभा क्षेत्रातील तब्बल १४ हजार ५७८ बॅनर, पोस्टर, कटआउट, भिंतीपत्रक आणि झेंडे हटविण्यात आले आहेत. या कारवाईमुळे पुन्हा एकदा जिल्ह्यातील चौक बॅनर, पोस्टर हटवल्याने स्वच्छ आणि सुंदर दिसू लागले आहे.

विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा क्षेत्रात निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या राजकीय पुढाऱ्यांसह आजी माजी लोकप्रतिनिधींनी आगामी निवडणूका डोळ्यासमोर ठेवून गणेशोत्सव, नवरात्रोत्सव जोरदार चौकाचौकांमध्ये बॅनर बाजी केल्याचे पाहण्यास मिळाली. त्यातच राजकीय पक्षांच्या नेत्यांना वाढदिवसांच्या शुभेच्छा देणारे फलक लावण्यात येतात. पक्षात मोठे पद मिळालेल्या नेत्यांना शुभेच्छा देणारे फलक लावण्यात येतात. हे फलक लावल्यानंतर ते काढण्याची तसदी मात्र, त्यांच्याकडून घेण्यात येत नसल्याचे देखील दिसून येत असते. यामुळे बरेच दिवस हे फलक त्याच जागेवर दिसून येतात. या फलकांमुळे शहरातील चौक व नाके विद्रुपीकरण होते. अशा बेकायदा फलकांवर स्थानिक स्वराज्य संस्थांकडून फारशी कारवाई होत नसल्याची ओरड सातत्याने होत असते. त्यात विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर गेल्या काही महिन्यांपासून शहरात राजकीय बॅनरबाजीचे प्रमाण वाढले होते. शहरातील नाक्यानाक्यांवर आणि चौकाचौकात राजकीय पक्षांच्या नेत्यांचे फलक झळकताना दिसून येत होते. तर, कुठे केलेल्या कामाचे श्रेय घेणारे फलक देखील लावण्यात आले होते. यामुळे शहराचे विद्रुपीकरण झाल्याचे चित्र होते. दरम्यान, मंगळवारी दुपारनंतर विधानसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू झाली आणि त्यानंतर ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदार संघात लावण्यात आलेले राजकीय पक्षांचे बॅनर, झेंडे, पोस्टर, कटआउट उतरविण्यास सुरूवात केली.



दरम्यान, ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा सभा मतदार संघात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील बेकायदापणे लावण्यात आलेले राजकीय बॅनर, पोस्टर, भिंती पत्रके, झेंडे काढून टाकण्याची कारवाई करण्यास सुरुवात केली. त्यानुसार मागील ७२ तासांत प्रशासनाने शासकीय, सार्वजनिक व खासगी मालमत्तांवरील ६ हजार ५६१ बॅनर, ३ हजार १५६ पोस्टर, २ हजार ५३४ झेंडे, एक हजार भिंती पत्रके आणि १ हजार ३२३ कट आउट काढण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

# परतीच्या पावसामुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत, नुकसानग्रस्तांना भरपाई द्यावी

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश

**मुंबई :** राज्याच्या विविध भागात मागील काही दिवसांमध्ये परतीच्या पावसापरतीच्या पावसामुळे झालेल्या शेतीच्या तसेच इतर नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्यात यावेत, त्याचबरोबर नुकसानग्रस्तांना भरपाई देण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.मुळे झालेल्या शेतीच्या तसेच इतर नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्यात यावेत, त्याचबरोबर नुकसानग्रस्तांना भरपाई देण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

राज्यातील विविध भागांमध्ये अमरावती, पुणे, नाशिक, कोल्हापूर, मराठवाडा आदी विविध भागातील विविध जिल्हे किंवा तालुक्यांमध्ये मागील काही दिवसात मुसळधार पाऊस झाला. काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह पाऊस झाला.

यामुळे अनेक ठिकाणी शेतपिकांचे नुकसान झाले आहे. बऱ्याच ठिकाणी शेतात काढून ठेवलेल्या विविध प्रकारच्या पिकांचे नुकसान झाले आहे. काढलेली पिके भिजली आहेत.

विशेषतः भात, सोयाबीन, तूर, कपाशी, ऊस आदी विविध प्रकारच्या पिकांसह फळबागांचेही नुकसान झाले आहे. या सर्व नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्यात यावेत. नुकसानग्रस्तांना भरपाई देण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.पंचनामे आणि नुकसान भरपाईसाठी नुकसानग्रस्त गावांमध्ये त्वरित यंत्रणा कार्यरत करण्यात यावी. संबंधित अधिकाऱ्यांना सूचना द्याव्यात, असे निदेशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहे. जिल्हास्तरावरील आपत्ती व्यवस्थापन कक्ष, तालुकास्तरीय यंत्रणा, इतर सर्व संबंधित विभाग यांनी यासाठी समन्वयाने काम करावे, अशा सूचनाही मुख्यमंत्री शिंदे यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

# मतदान जनजागृतीसाठी कोपरी पाचपाखाडीमध्ये महिला मेळाव्याचे आयोजन

**ठाणे :** विधानसभा मतदानाची टक्केवारी वाढावी किंबहुना नागरिकांना मतदानाचे महत्व पटवून देण्याच्या दृष्टीने १४७ कोपरी पाचपाखाडी विधानसभा मतदारसंघातील शाळा क्र. ३८ येथे महिला पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता. स्वीपच्या माध्यमातून शुक्रवारी (१८ ऑक्टोबर)या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या महिला मेळावा कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी पथनाट्याच्या माध्यमातून मतदानाचे महत्व पटवून देत उपस्थितांमध्ये जनजागृती केली. लोकसभा निवडणुकीप्रमाणे नागरिकांनी येत्या २० नोव्हेंबर २०२४ रोजी होत असलेल्या विधानसभा निवडणूकीतही आपला मतदानाचा हक्क बजावावा. त्याचप्रमाणे आपल्या घरातील, आजूबाजूच्या परिसरातील नागरिक, मित्रपरिवार यांना देखील मतदान करण्यासाठी प्रवृत्त करावे असे मार्गदर्शन स्वीपचे राजेंद्र परदेशी यांनी यावेळी केली. लोकशाहीने दिलेला अधिकार मी बजावणारच अशी शपथ या कार्यक्रमादरम्यान देण्यात आली. पालकांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद या कार्यक्रमास मिळाला. यावेळी नोडल अधिकारी कमलाकांत म्हेत्रे, अनंत परदेशी, अनंत सोनावळे, अविनाश सावंत, सिताराम परब आदी स्वीप सदस्य उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नियोजन शाळा क्र. ३८ च्या मुख्याध्यापिका आशा पाटे, मनोज सिंग यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षकांनी केले होते.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि.२१ ऑक्टोबर २०२४ पान : ६
www.diwanews.com

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते ऑलिम्पिक खेळाडूंचा सन्मान




# स्वप्निल कुसळे यास २ कोटी रुपये तर सचिन खिलारी यास ३ कोटी रुपयांचा धनादेश सुपूर्द

**मुंबई :** पॅरिस, फ्रान्स येथे २०२४ मध्ये झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये पदक प्राप्त खेळाडूंना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते धनादेश आणि स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

सह्याद्री अतिथीगृह येथे आज खेळाडूंना सन्मानित करण्यात आले. यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, क्रीडा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे आयुक्त सुरज मांढरे उपस्थित होते. पॅरिस, फ्रान्स येथे आयोजित करण्यात आलेल्या ऑलिम्पिक स्पर्धेतील नेमबाजी स्पर्धेमधील ५० मीटर रायफल ३ पोझीशन या उपप्रकारामध्ये कास्य पदक प्राप्त करणाऱ्या स्वप्निल कुसळे व पॅरा ऑलिम्पिक स्पर्धेतील मैदानी स्पर्धेमधील गोळाफेक या उपप्रकारामध्ये रौप्य पदक प्राप्त करणाऱ्या सचिन खिलारी या खेळाडूंचा व श्री.कुसळे यांच्या प्रशिक्षक दिपाली देशपांडे व श्री. खिलारी यांचे प्रशिक्षक अरविंद चव्हाण यांना सन्मानित करण्यात आले. राज्य शासनाने नुकत्याच आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडू व प्रशिक्षकांच्या पारितोषिकाच्या रकमेमध्ये केलेल्या भरघोस वाढीच्या पार्श्वभूमीवर पॅरिस, ऑलिम्पिक स्पर्धेतील नेमबाजी स्पर्धेमधील कास्य पदक प्राप्त करणाऱ्या स्वप्निल कुसळे यास दोन कोटी रुपये तसेच त्यांच्या प्रशिक्षक दिपाली देशपांडे यांना २० लाख रुपये व पॅरा ऑलिम्पिक स्पर्धेतील मैदानी स्पर्धेमधील रौप्य पदक प्राप्त करणाऱ्या सचिन खिलारी यास तीन कोटी रुपये तसेच त्यांचे प्रशिक्षक अरविंद चव्हाण यांना ३० लाख रुपयांचा धनादेश व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

बुडापेस्ट, हंगेरी येथे दि. १० ते २३ सप्टेंबर, २०२४ या कालावधीत झालेल्या ४५ व्या बुद्धीबळ ऑलिम्पियाड स्पर्धेत पुरुष व महिला गटात अनुक्रमे १९३ व १८१ देशांचे संघ सहभागी झाले होते. या स्पर्धेत भारताच्या संघाने सुवर्णपदक संपादन करुन ऐतिहासिक कामगिरी केली आहे. या संघात राज्याचे बुद्धीबळपटू विदीत गुजराथी व दिव्या देशमुख यांचा समावेश होता, या दोन्ही खेळाडूंचा राज्य शासनाच्या वतीने प्रत्येकी रोख एक कोटी रुपये व त्यांचे मार्गदर्शक अनुक्रमे संकल्प गुप्ता व अभिजीत कुंटे यांना प्रत्येकी १० लाख रुपये इतकी रक्कम व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. विदीत गुजराथी स्पर्धेकरिता विदेशात असल्यामुळे त्यांच्यावतीने त्यांचे वडील डॉ. संतोष गुजराथी यांनी तर अभिजीत कुंटे यांच्या वतीने त्यांच्या पत्नी मेघना कुंटे आणि संकल्प गुप्ता यांच्यावतीने त्यांचे वडील संदीप गुप्ता यांनी सन्मान स्वीकारला.

# मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र प्रमुखांचा सन्मान

**ठाणे :** केंद्र व राज्यशासनाच्या वतीने रुग्णांना शासकीय रुग्णालयात दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाव्यात या हेतूने कायाकल्प पुरस्कार रुग्णालयांना देण्यात येतो. यावर्षी कायाकल्प पुरस्कारांची घोषणा राज्यस्तरावरून करण्यात आली असून ठाणे जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर ९ संस्थाना व आयुष्मान आरोग्य मंदिर उपकेंद्र स्तरावर १८ संस्थांना हा पुरस्कार प्राप्त झालेला आहे. त्यानिमित्ताने जिल्हा परिषद येथील सभागृहात आज, दि. १५ ऑक्टोबर, २०२४ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व सन्मान चिन्ह देऊन प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र प्रमुख यांचा सन्मान करण्यात आला.

कायाकल्प परितोषिक मिळवण्यामध्ये सर्व संस्थांचे सर्व वैद्यकीय अधिकारी, नर्सिंग स्टाफ, प्रशासकीय विभाग व विशेषतः सर्व सफाई कर्मचारी यांचा मोलाचा वाटा आहे. सर्वांचे विशेष अभिनंदन आणि ठाणे जिल्ह्यातील इतर सर्व प्राथमिक आरोग्य केंद्राना विविध पुरस्कार प्राप्त करण्यासाठी प्रेरणास्थान म्हणून पुढील कामकाज करावे असे मार्गदर्शन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले.

यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. स्वाती पाटील, निवासी वैद्यकिय अधिकारी (बा.स) डॉ. मृणाली राहुड, सर्व तालुका आरोग्य अधिकारी तसेच आरोग्य विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत कायाकल्प पुरस्कार सुरू करण्यात आला असून आरोग्य सेवेतील गुणवत्ता व सोयी सुविधा उत्तम करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. बाह्य परिसर स्वच्छता व सुशोभिकरण,



जैविक घन कचरा व्यवस्थापन, सांड पाणी व्यवस्थापन, आंतरिक स्वच्छता, निर्जंतुकीकरण, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची उपलब्धता तसेच रुग्णांचे अभिप्राय या बाबींवर मूल्यांकन गुण कायाकल्प अंतर्गत ठरविण्यात येतात.

प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर प्रा .आ केंद्र खारबाव यांनी रक्कम रुपये २ लक्ष पारितोषिक व आयुष्मान आरोग्य मंदिर उपकेंद्र स्तरावर उपकेंद्र लाप ता .भिवंडी यांनी रक्कम रुपये १ लक्ष पारितोषिक घेऊन जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक पटकावलेला आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र वज्रेश्वरी ,धसई ,शेणवा ,कसारा ,दाभाड ,शिरोशी ,खडवली ,बदलापूर यांनाही प्रोत्साहनपर ५० हजार रु. पारितोषिक प्राप्त झाले आहे. उपकेंद्र स्तरावरील उपकेंद्र सापगाव ता. शहापूर प्रथम उपविजेता ५० हजार रु, उपकेंद्र फळेगाव ता.कल्याण दुसरे उपविजेता ३५ हजार रु पारितोषिक घेऊन यशस्वी झाले आहेत. उपकेंद्र भिसोल, ओजीवले, कान्होर, दापोडे, वडूनवघर, पहारे, नडगाव, मानिवली, साने, खांबाला, बोहोनोली, भिणार, कालवर, उसगाव, आमने या उपकेंद्रांना प्रोत्साहनपर पारितोषिक प्राप्त झाले आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि.२१ ऑक्टोबर २०२४


## ठाण्यात वॉशिंग मशीनला आग; तिघे बचावले

**ठाणे:** कळवा, विश्वकर्मा नगर या ठिकाणी असलेल्या सनराईज अपार्टमेंट या इमारतीच्या चौथ्या मजल्यावरील रूम नंबर ४०६ या लक्ष्मण बामणे यांच्या घरातील वॉशिंग मशीन युनिटला रविवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास आग लागली. ही आग जवळपास तासाभराने नियंत्रणात आली. या आगीत वॉशिंग मशीन, एसी, कपाट, बाथरूम, किचन मधील साहित्याचे जळून नुकसान झाले आहे. तर आग लागली तेंव्हा घरामध्ये ०३ व्यक्ती होत्या, त्या सुरक्षेच्या कारणास्तव घराबाहेर पडल्याने सुदैवाने बचावल्या आहेत. तासाभराने आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले.

SHWAAS
ACE NX HOSPITAL & RESEARCH CENTRE
Superspeciality Hospital
Our Passion Your Care
२५,००० ते २,००,००० पर्यंत विमा योजना



मुख्यमंत्री सहायता निधी
CM Relief Fund
फुफ्फुस प्रत्यारोपण
हिप रिप्लेसमेंट
अपघात शस्त्रक्रिया
कर्करोग (केमोथेरपी/रेडिएशन)
लहान बालकांचे शस्त्रक्रिया
अपघात
हृदयरोग
डायलिसिस
हाताचे प्रत्यारोपण
गुडघ्यांचे प्रत्यारोपण
विद्युत अपघात रुग्न
नवजात शिशुंचे आजार
बर्न रुग्न
मेंदूचे आजार
कर्करोग शस्त्रक्रिया
Address
Mahavir height, Golul Nagari, opp. Mumbai University, Wayle Nagar, Khadakpada, Kalyan, Maharashtra- 421301
Emergency
7777008464
9076229076

# चिपळूण-संगमेश्वर विधानसभेत गाव विकास समितीकडून विकासाच्या चार गॅरंटी

## १. अद्यावत कॅशलेस हॉस्पिटल,
## २. रोजगारासाठी एमआयडीसी विकास,
## ३. ग्रामीण शाळांचा शैक्षणिक दर्जा सुधारणार
## ४. उत्तम दर्जाच्या पायाभूत सुविधा

**संगमेश्वर/देवरुख:-**
अद्यावत कॅशलेस हॉस्पिटल, रोजगारासाठी एमआयडीसी विकास, ग्रामीण भागातील शाळांचा शैक्षणिक दर्जा सुधारणार आणि उत्तम दर्जाच्या पायाभूत सुविधा. या चार गॅरंटी गाव विकास समितीच्या माध्यमातून येणाऱ्या विधानसभेत मतदारांना देण्यात आल्या असून गाव विकास समितीच्या उमेदवार अनघा कांगणे यांना विजयी करण्याचे आवाहन संघटनेचे संघटन प्रमुख सुहास खंडागळे यांनी मतदारांना केले आहे.

गाव विकास समितीच्या माध्यमातून मतदारांना दिल्या जाणाऱ्या चार प्रमुख विकास कामांची माहिती गाव विकास समितीचे अध्यक्ष उदय गोताड व संघटन प्रमुख सुहास खंडागळे यांच्यामार्फत नागरिकांसाठी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये चिपळूण-संगमेश्वर मधील मतदारांना एकूण चार विकासाच्या प्रमुख गॅरंट्या देण्यात आल्या आहेत. चिपळूण-संगमेश्वर मधील सर्वसामान्य नागरिकांना उपचारासाठी अद्यावत रुग्णालय नाही, सर्वसामान्य, गरीब, मध्यमवर्गीय नागरिकांना वेळेत उपचार न मिळाल्याने अनेक वेळेला रुग्णाला आपला जीव गमवावा लागतो.तालुका जिल्हा अशा ठिकाणी रुग्ण नेई पर्यंत वाटेत त्याचा जीव जाण्याचा धोका अनेक वेळा असतो.त्यानंतर जिल्ह्यालाही उपचार न मिळाल्यास कोल्हापूर, सांगली,मुंबई अशा ठिकाणी पेशंटला हलवावे लागते. या सर्व प्रकारात अनेक वेळेला पेशंट दगावतो ही स्थिती बदलण्यासाठी व चिपळूण संगमेश्वर मधील नागरिकांना त्यांच्या भागातच दर्जेदार उपचार मोफत मिळावेत यासाठी अद्यावत कॅशलेस हॉस्पिटल उभारण्याची गॅरंटी गाव विकास समितीच्या वतीने संघटन प्रमुख सुहास खंडागळे यांनी दिली आहे. उत्तम आरोग्य सुविधा मिळण्यासाठी गाव विकास समितीचा उमेदवार विजयी करा असे आवाहन खंडागळे यांनी केले आहे.

ग्रामीण भागातील तरुणांना रोजगार नसल्याने अनेक तरुण त्यांचे शिक्षण पूर्ण करून मुंबई पुणे कोल्हापूर सांगली अशा शहरात नोकरीसाठी जातात. कोकणात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कोकणातच रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी चिपळूण-संगमेश्वर विधानसभा मतदारसंघात एमआयडीसीचा विकास केला जाईल व तरुणांना या ठिकाणी रोजगार दिला जाईल अशी गॅरंटी गाव विकास समितीच्या वतीने या निवडणुकीमध्ये देण्यात आली आहे.

ग्रामीण भागातील शैक्षणिक सुधारणा बाबत गाव विकास समितीने गॅरंटी दिली असून शाळांचा दर्जा सुधारण्यात येईल व उत्तम दर्जाचे शिक्षण गाव खेड्यातील शाळांमध्ये उपलब्ध करून देण्यात येईल असे गाव विकास समितीमार्फत सांगण्यात आले आहे.

ग्रामीण भागात दळणवळणाची साधने सहज उपलब्ध व्हावी. त्यासाठी उत्तम दर्जाचे रस्ते पाणीपुरवठा योजनांचे व्यवस्थापन व नियोजन, आपल्याकडे धो धो पाऊस पडूनही उन्हाळ्यात अनेक गावांना पाणीटंचाई भेडसावते त्याचे योग्य पद्धतीने नियोजन करण्याची गॅरंटी ही गाव विकास समितीने या निवडणुकीदरम्यान मतदारसंघातील नागरिकांना दिली आहे.गाव विकास समितीच्या उमेदवार सौ. अनघा कांगणे यांना विजयी करण्याचे आवाहन संघटनेचे अध्यक्ष उदय गोताड व संघटन प्रमुख सुहास खंडागळे यांनी केले आहे.

# ऐरोली, बेलापूर, ठाणे शहर,कोपरी पाचपाखाडी, कळवा-मुंब्रा आणि मीरा-भाईंदरमधील मतदार यादीत घोळ



# ठाण्यात मतदार यादीत दुबार,बोगस नावे 'जैसे थे'

## मतदार यादीत पारदर्शकता आणा अन्यथा महाविकास आघाडी जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात आंदोलन करणार

**ठाणे : ऐरोली,बेलापूर, ठाणे शहर,कोपरी पाचपाखाडी,कळवा मुंब्रा आणि मीरा-भाईंदरसह ठाणे जिल्हयात मतदार यादीत प्रचंड घोळ घातला आहे. अधिकारी आणि सत्ताधारी यांच्या आशीर्वादाने दुबार आणि बोगस मतदार घुसविण्यात आले असून पुरावे देऊनही नावे वगळली नाहीत. त्यामुळे लेखी खुलासा करण्याची मागणी शिवसेना नेते राजन विचारे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. तसेच दोन दिवसांत मतदार यादीत पारदर्शकता आणा अन्यथा महाविकास आघाडी जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात आंदोलन करणार असा इशारा यावेळी देण्यात आला आहे. राजन विचारे यांनी आज पुन्हा एकदा जिल्हाधिकारी तसेच उपजिल्हाधिकारी निवडणूक अधिकारी यांना पत्राद्वारे दुबार नावे न वगळण्याची कारणे काय? याचा खुलासा लेखी स्वरूपात देण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे.**

### पुरावे देऊनही नावे वगळली नसल्याने खुलासा करण्याची शिवसेनेची लेखी मागणी

नुकताच पार पडलेल्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकी त ठाणे लोकसभा मतदार संघात बोगस मतदान मोठ्या प्रमाणात झाल्याने या बोगस मतदानाला आळा घालण्यासाठी वारंवार जिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी निवडणूक अधिकारी यांची भेट घेण्यात आली होती. या भेटीत ठाणे लोकसभा मतदार संघातील ६ विधानसभा मतदार यादीतील दुबार नावे सॉफ्टवेअर द्वारे शोधून याची सॉफ्ट व हार्ड कॉपी जिल्हाधिकारी यांच्याकडे सोपविण्यात आली होती. त्यावेळी सर्व दुबार नावे वगळण्याचे आदेश ही अधिकाऱ्यांना दिले, परंतु याची कोणतीही कार्यवाही योग्य रीतीने न झाल्याने राजन विचारे यांनी प्रशासनाबाबत खेद व्यक्त केले आहे.१ लाख ९३ हजार ३०२ पैकी ४ हजार ११९ दुबार नावे वगळण्यात आलेचे निदर्शनास आले आहे. तर ११ हजार ९६१ दुबार नावे वगळण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाचे सीईओ यांच्याकडे परवानगी मागितल्याचे ही समजते, परंतु निवडणूक जाहीर झाली असून अद्यापही नावे वगळण्याची परवानगी राज्य निवडणूक आयोगाने दिली नसल्याने याचा स्पष्ट लेखी खुलासा मागितला आहे.

**आता दुबार नावाचे मतदार घेऊन पुरावे आणणार**

नव्याने नोंदविण्यात आलेले मतदार यादीतील नावे वेगवेगळ्या विधानसभा क्षेत्रात वेगवेगळ्या यादीत घुसविण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू असल्याचे दिसून आले याचे पुरावे ही वारंवार अधिकाऱ्यांना देत होते परंतु कोणतीही दखल न घेतल्याने प्रशासना बाबत खासदार राजन विचारे यांनी खेद व्यक्त केले आहे. दरम्यान, याआधी कागदोपत्रे दुबार मतदारांची पुरावे दिले आता दुबार नावाचे मतदार घेऊन पुरावे आणणार असल्याचा इशारा विचारे यांनी दिला.

## पगारवाढ आणि बोनस मिळावा यासाठी इलेक्ट्रीक बसचालकांचे सात तास काम बंद आंदोलन

ठाणे : पगार वाढवून द्यावा, बोनस मिळावा या मागणीसाठी ठाणे परिवहन सेवेत इलेक्ट्रीक बसवर कार्यरत असलेल्या कंत्राटी बस चालकांनी बुधवारी पहाटे ३ वाजल्यापासून काम बंद आंदोलन पुकारला होता. त्याचा फटका नोकरदार बसण्यास सुरुवात झाल्यावर अखेर सकाळी १० वाजता ठेकेदारांनी त्या चालकांची मागणी मान्य केली. तर पगार वाढ १ हजार केल्यावर त्या कर्मचाऱ्यांनी आंदोलन मागे घेतल्याची माहिती परिवहनच्या एका वरीष्ठ अधिकाऱ्याने दिली.

ठाणे परिवहनच्या सेवेत मागील एक वर्षापपासून टप्याटप्याने इलेक्ट्रीक बस दाखल होत आहेत. या सेवेत काम करण्यासाठी सुमारे ५०० च्या आसपास कंत्राटी कर्मचारी (चालक) कार्यरत आहेत. परंतु कमी पगाराच्या मुद्यावरुन या कर्मचाऱ्यांनी मागील महिन्यातही आंदोलन केले होते. तेव्हा त्यांच्या सर्व मागण्या मान्य असल्याचे सांगत त्यानुसार पुढील कार्यवाही केली जाईल असे आश्वासन ठेकेदाराने दिले होते. परंतु त्यानंतरही या मागण्या कागदावरच राहिल्याने या चालकांनी बुधवारी पहाटे ३ वाजल्यापासून काम बंद आंदोलन पुकारले. त्याचा परिणाम सकाळच्या सत्रात कामाला जाणाऱ्या चाकरमान्यांना काही प्रमाणात का होईना सहन करावा लागला. या कर्मचाऱ्यांच्या म्हणण्यानुसार आम्हाला २५ हजार रुपये वेतन मिळणे अपेक्षित असतांना ठेकेदार अवघे १८३०० रुपयेच वेतन देत आहे. त्यामुळे नियमानुसार असलेले वेतन मिळावे अशी मागणी त्यांची होती. तसेच बोनस देखील मिळावी अशीही त्यांनी मागणी होती. परंतु ज्या कर्मचाऱ्यांना सेवेत एक वर्षांचा कालावधी पूर्ण झाला असेल त्यांनाच बोनस दिला जाईल अशी भुमिका ठेकेदाराने घेतल्याने हे आंदोलन पुकारण्यात आल्याचे चालकांचे म्हणणे होते..